## निशाणी क्र. ३० वरील आदेश

१. प्रतिवादी क्र. १ श्री. सखाराम गोविंद ठोंबरे यांच्या मृत्युचा दाखला ग्रामसेवक ग्रुप ग्रामपंचायत टेंभरी यांनी दाखल करावा असा आदेश पारीत करण्यासाठी सदरचा अर्ज वादी यांनी दाखल केलेला आहे.

२. अर्जातील कथन असे आहे की, प्रतिवादी क्र. १ सखाराम ठोंबरे हे दि. ३०/११/२०२१ रोजी मयत झालेले आहेत. वादी यांना त्यांच्या मृत्युचा दाखला दाव्याच्या कामासाठी आवश्यक आहे परंतु राजकीय दबावापोटी संबंधित ग्रामसेवक मृत्युचा दाखला वादी यांना देत नाहीत. म्हणुन प्रतिवादीच्या मृत्युचा दाखला दाखल करण्याचे आदेश संबंधित ग्रामसेवकाला द्यावेत अशी विनंती वादींनी केली आहे.

३. प्रतिवादीतर्फे या अर्जास म्हणणे दाखल करण्यात आले. अर्जातील कथने चुकीचे असल्याचे नमुद करुन सदर अर्जास उशीर झाल्याने अर्ज मंजुर करण्यास त्यांची सक्त हरकत असल्याचे प्रतिवादीचे म्हणणे आहे.

४. वादीचे अर्जातील कथने व प्रतिवादीचे म्हणणे याचे अवलोकन केले. प्रतिवादी यांनी आपल्या म्हणण्यामध्ये प्रतिवादी क्र. १ मयत झाले किंवा नाही याबाबत कोणतेही कथन केलेले नाही. वादी यांनी सदरचा दावा निरंतरचा मनाई हुकूमाकरीता दाखल केलेला आहे. दाव्याचा निकाल गुणदोषावर होण्याकरीता व वादी प्रतिवादी यांच्यामधील वादाचे कायमस्वरुपी निराकरण होण्याकरीता प्रतिवादी क्र. १ चे वारस अभिलेखावर येणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ चे वारस अभिलेखावर घेण्याकरीता प्रतिवादी क्र. १ चा मृत्यु दाखलाही दाव्यात दाखल होणे आवश्यक आहे. म्हणुन मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. वादीचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. ग्रामसेवक ग्रुप ग्रामपंचायत टेंभरी यांनी प्रतिवादी क्र. १ श्री. सखाराम गोविंद ठोंबरे यांचे मृत्युचा दाखला पुढील तारखेपर्यंत न्यायालयात हजर करावा.

३. ग्रामसेवक ग्रुप ग्रामपंचायत टेंभरी यांना नोटीस काढून या आदेशाची माहिती द्यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by
WABALE
RAMDAS DAULAT
Date: 2023.06.16
17:09:34 -0800

खालापूरः (आर.डी.वाबळे)

दि. १६/०६/२०२३ दिवाणी न्यायाधिश क.स्तर खालापूर

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : M. S. Shirgire, Steno. (L.G.) |
| (b) | Court | : Shri. R. D. Wabale<br>C.J.J.D. & J.M.F.C.,Khalapur |
| (c) | Date of Judgment/Order | : 16/06/2023 |
| (d) | Judgment/Order signed by the Presiding Officer on | : 16/06/2023 |
| (e) | Judgment/Order uploaded on | : 17/06/2023 |